# कोल्हापूरच्या राज्याचा

# इतिहास

रा० सा० अण्णा बाबाजी लठ्ठे एम्. ए.

यांनी लिहिला,

व तो

रा० रा० गणेश शंकर गोखले यांनीं

आर्य... 'विद्याविलास' छापखान्यांत छापून

प्रसिद्ध केला..

ी ग्रंथा
तिहास ९

# कोल्हापूरच्या राज्याचा इतिहास.

## राज्याचा हल्लींचा विस्तार.

१. कोल्हापूरचे राज्यास पश्चिमेकडून पर्वताची आणि बाकीच्या बाजूंकडून नद्यांची स्वाभाविक मर्यादा झाली आहे. पश्चिमेकडे सह्याद्रि पर्वत आहे. उत्तरेस वारणा नदी आहे. पूर्वेस कृष्णा नदी आहे व त्यास लागूनच ईशान्येला सांगली, मिरज व कुरुंदवाड हीं पटवर्धनांचीं संस्थानें आहेत. दक्षिणेला मलप्रभा नदी आहे. ह्या मर्यादेंतील सर्व प्रांत सुमारें ३,००० चौरस मैल आहे. त्यांत १,००० चौरस मैल कोल्हापूरच्या राज्याच्या पोट जहागीरदारांकडे असून उरलेला खुद्द महाराज सरकारांच्या प्रत्यक्ष ताब्यांत आहे. या प्रांतांत मोठीं गांवें ९ व खेडीं १,०७० आहेत.

## लोकसंख्या.

२. या इलाख्याची लोकसंख्या ८,३३,००० आहे. मराठे, लिंगायत, जैन, ब्राह्मण, मुसलमान व महारमांग

जाती मुख्य आहेत. एकंदर जैन ३८ हजार; ब्राह्मण २६ हजार; मुसलमान ३३ हजार आणि महार वगैरे ९६ हजार आहेत. याशिवाय ख्रिस्ती लोक २,४०० अलीकडे झाले आहेत. ब्राह्मणांत देशस्थ १६,५००; चित्पावन ३,९००; सारस्वत २,६०० असे निरनिराळ्या पोटजातींचे लोक आहेत.

## जुना काळ.

३. हल्लीं कोल्हापूरचें राज्य **क्षत्रिय मराठ्यांच्या** वंशाकडे आहे. तें त्यांच्याकडे सुमारें २०० वर्षांपूर्वीं आलें. त्यापूर्वीं हा मुलूख दिल्ली आणि विजापूर येथील मुसलमान राजांच्या अमलांत होता. त्याच्या मागचा इतिहास चांगलासा सांपडत नाहीं. फक्त शिलालेखांवरून माहिती मिळते तीवरून असें दिसतें कीं, १५ शें वर्षांपूर्वीं येथें **बौद्ध** व **जैन** लोकांचीं राज्यें होतीं. त्यानंतर **चालुक्य, कलभूर्य, यादव, रट्ट, कदंब** आणि **शिलाहार** या वंशांचे राजे इकडे राज्य -रीत होते. त्यांतील **कलभूर्य** व **शिलाहार** राजे **जैन** -न बाकीचे **हिंदु** होते. १२ व्या शतकांत **बसव** यानें लिंगायत धर्माचा प्रसार केला व कित्येक हिंदु राजांनीं -र्मास उत्तेजन दिलें. या सर्व कालांत, राजा कोण-

त्याहि धर्माचा असला तरी तो हिंदु, जैन व लिंगायत लोकांना सारख्याच देणग्या देत असे. या राजांची राजधानी **वळीवडें, बीड, पन्हाळा** वगैरे ठिकाणीं असे. फार प्राचीन काळीं कोल्हापूर हें भरभराटीस आलेलें शहर होतें. पण भूकंप होऊन त्याचा नाश झाला असावा असें दिसतें. पुढें हल्लींच्या वंशाकडे येथील अंमल आल्यावर त्यांनीं कोल्हापुरास राजधानी केली.

## मराठे क्षत्रियांचे राज्यास सुरवात.

४. आमचे श्रीछत्रपति महाराज सरकार हे शककर्ते श्रीशिवाजी महाराज भोसले यांच्या वंशांत जन्मले आहेत. शिवाजी महाराजांनीं रायगड किल्ल्यावर सन १६७४ सालीं आपली गादी स्थापन केली. त्यांचे पूर्वज उदेपूरच्या सूर्यवंशी क्षत्रिय राजांचे वंशांत जन्मले होते व त्यांनीं दाक्षिणेंत येऊन अहमदनगर आणि विजापूरच्या मुसलमानी राज्यांत जहागिरी मिळविल्या होत्या. शिवाजी महाराजांनीं आपल्या पराक्रमानें मोठें राज्य स्थापन करून ‘ **छत्रपति** ’ ही पदवी घेऊन आपला राज्याभिषेक करविला. त्यांचा वंश क्षत्रिय होय, असा त्या वेळेच्या पंडितांनीं निर्णय करून महाराजांचा

अभिषेक **वेदोक्त** पद्धतीनें केला. ( इ० स० १६७४ ) त्यांस **संभाजी** आणि **राजाराम** असे दोन पुत्र होते. त्यांतील संभाजी हा राज्य करीत असतां त्यास पकडून नेऊन **अवरंगजेब** बादशहानें दिल्लीस त्याचा वध केला. ( इ० स० १६८९ ) बरोबर नेलेला त्याचा मुलगा **शाहु** व बायको **येसूबाई** यांना बादशहानें आपले राजवाड्यांत बंदींत ठेविलें.

## पडता काळ.

५. **संभाजी**चा वध झाल्यानंतर कांहीं काळ मुसलमानांनीं दक्षिणेंत सर्वत्र धुमाकुळ माजविला. तरी **शिवाजीं**चा धाकटा मुलगा **राजाराम** व त्याचे मागून त्याची बायको **ताराबाई** यांनीं मराठ्यांच्या गादीचें फार चातुर्यानें रक्षण केलें. **संताजी घोरपडे, धनाजी जाधव** वगैरे मराठे, **रामचंद्रपंत** अमात्य वगैरे देशस्थ आणि **खंडोबल्लाळ** प्रभु या सेवकांनीं मराठी राज्याची उत्तम सेवा केली. या अस्वस्थतेच्या काळांत त्यांना स्वतःकरितां जहागिरी मिळवून स्वस्थ राहतां आलें असतें. पण स्वामिनिष्ठपणानें त्यांनीं **राजारामाची** नोकरी करून, **संभाजीनें** गमाविलेलें राज्य परत मिळविलें.

## भाऊबंदकीस आरंभ.

६. संभाजीला मारिलें आणि लाखो लोकांचें सैन्य घेऊन दक्षिणेंत तळ दिला, तरी मराठ्यांचा नाश करवला नाहीं, ह्मणून कंटाळलेला अवरंगजेब नगराजवळ सन १७०७ सालीं मृत्यु पावला. त्याच्यामागून झालेल्या बादशहाला हें युद्ध आपण पुढें चालविण्यापेक्षां, कैदेंत असलेल्या संभाजीच्या मुलास ( शाहूस ) ताराबाईबरोबर भांडण करण्यास पाठवावें हें बरें, असें वाटलें. बादशहाचा नोकर ह्मणून मराठ्यांचें राज्य चालविण्याचें शाहूनें कबूल केलें होतें. या त्याच्या बोलण्यांत अंतर पडूं नये ह्मणून, बादशहानें त्याच्या आईस आपल्या ताब्यांतच ठेऊन घेतलें होतें. आपल्या फायद्याचा याप्रमाणें बंदोबस्त करून बादशहानें ताराबाईकडून राज्य मिळविण्यास शाहूस रवाना केलें.

## शाहू व ताराबाई यांचें भांडण.

७. आपला पति राजाराम यानेंच मराठ्यांचें गमावलेलें राज्य मिळविलें होतें; शिवाय शाहू मुसलमानांची ताबेदारी पतकरून आलेला होता; या कारणानें ताराबाई शाहूस राज्य देण्याला नाकबूल होती. रामचंद्रपंत अमात्य व परशुरामपंत

प्रतिनिधी यांनीं तिचा पक्ष धरिला. धनाजी जाधव सेनापति व खंडो बल्लाळ चिटणीस हेसुद्धां प्रथम तिच्या बाजूसच होते. शाहूच्या सैन्याची व ताराबाईच्या सैन्याची खेड येथें (इ. स. १७०७) लढाई झाली. त्यांत आयत्या वेळीं सेनापति व चिटणीस यांस शाहूची बाजू घेणें रास्त वाटलें. या कारणानें शाहूस जय मिळाला व तो मराठ्यांच्या वडील घराण्याचा राजा झाला. तेव्हां अमात्य व प्रतिनिधी यांच्याबरोबर पन्हाळ्यास जाऊन **ताराबाईनें** स्वतंत्र राज्य स्थापन केलें. हाच कोल्हापूरच्या **हल्लींच्या राज्याचा आरंभ** होय. पुढें चार पांच वर्षें शाहू व ताराबाई यांच्या लढाया चालू होत्या. तरी सन १७१० मध्यें ताराबाईनें कोल्हापुरास ठाणें दिलें.

## दोन तट पडले.

८. याच वेळीं धनाजी जाधव मृत्यु पावला. त्याच्या पदरीं बाळाजी विश्वनाथ नांवाचा चित्पावन ब्राह्मण कारकून होता, तो मोठा हुशार व कावेबाज असे. धनाजीच्या मागें शाहू अडचणींत असतां त्यास मदत करून बाळाजी मुख्य प्रधान (पेशवा) झाला. परंतु आपल्या नोकरींत असतां त्यानें आपला अपमान केला होता, या आठवणीनें

धनाजीचा मुलगा चंद्रसेन जाधव यास बाळाजीबद्दल मोठा राग होता. शिवाय आयत्या वेळीं आपल्या बापानें ताराबाईचा पक्ष सोडला याबद्दल त्याला वाईट वाटत होतें. ह्मणून त्यानें ताराबाईचा पक्ष उचलून धरून तिचा मुलगा शिवाजी यास मराठ्यांचा राजा बनविण्याचा बेत केला.

९. दुर्दैवानें ताराबाईचा मुलगा **शिवाजी**—कोल्हापूरचा पहिला राजा—सन १७१२ सालीं मृत्यु पावला. त्याला पुत्र नव्हता. मात्र त्याची बायको गरोदर होती. शिवाजीचे मागून त्याचा सावत्र भाऊ संभाजी हा छत्रपति झाला. त्याचें व शाहूचें भांडण चाललेंच होतें. त्यांत शिवाजी महाराज व राजाराम यांच्या वेळेचीं मराठ्यांचीं व देशस्थांचीं घराणीं कोल्हापूरच्या बाजूस होतीं. शाहूची सर्व भिस्त बाळाजीवर असे. ही संधी पाहून व आपल्या हुशारीच्या बळावर बाळाजीनें आपल्या जातीचीं माणसें साताऱ्च्या दरबारांत पुढें आणिलीं.

## शाहू व संभाजी.

१०. शाहू स्वभावानें भोळा, आळशी व चैनी होता. संभाजी मोठा शूर आणि धाडसी होता. कांहीं मुत्सु-

संभाजीला तोडून देण्यास शाहू तयार होता; पण मराठी राज्यांतील निम्मी वांटणी आपणांस पाहिजे असें संभाजीचें ह्मणणें पडलें. हैद्राबादच्या मुसलमान नबाबाची मदत दोघांनींही मागितली; पण ती संभाजीस मिळाली. दोघांचें सन १७२८ सालीं युद्ध झालें. त्यांत शाहूसच जय मिळाला.

## तंट्याचा शेवट.

११. या सुमारास उदाजी चवाण नांवाचा एक शिपायी अथणी तालुक्यांत लूट करूं लागला होता, त्याला शाहूचा सरदार श्रीपतराव प्रतिनिधी यानें वारणेच्या कांठीं जिंकिलें. त्या वेळीं संभाजी, ताराबाई वगैरे चवाणाबरोबर होते. संभाजी पळून गेले; पण ताराबाई श्रीपतरावाच्या हातीं सांपडली. त्यानें तिजला शाहूकडे नेलें व तेथें ती पुढें स्वस्थपणानें राहिली.

१२. या भांडणांत फायदा नाहीं असें पाहून इ० स० १७३० सालीं संभाजी तह करण्यास कबूल झाला. दोघांच्या भेटी मोठ्या प्रेमानें व थाटानें झाल्या; आणि ठरलें कीं, उत्तरेस वारणा, दक्षिणेस तुंगभद्रा व पूर्वेस कृष्णा यांतील सर्व प्रदेश संभाजीकडे रहावा.

## राज्याचा बंदोबस्त.

१३. भांडण मिटल्यावर संभाजीनें आठ प्रधान नेमून राज्याचा बंदोबस्त सुरू केला. **खेड**च्या लढाईंत इमान राखणाऱ्या **प्रतिनिधी**च्या नातवाला विशाळगडची जहागीर दिली. रामचंद्रपंतास बावड्याची जहागीर देऊन **अमात्य** केलें. संताजी घोरपडे यांनीं राज्य राखण्याची खूप खटपट राजारामाच्या वेळीं केली होती. त्यांचे पुतणे शिधोजीराव यांस कापशीची जहागीर देऊन **सेनापति** केलें. याशिवाय **मंत्री**, सुमंत, न्यायाधीश, पंडितराव वगैरे प्रधान त्यांनीं नेमिले. **अमात्या**कडे सर्व मुलकी कामाचा बंदोबस्त दिला. 'धर्मअधर्म पाहून शिक्षा करावी, शिष्टाचे सत्कार करावे, आचार व्यवहार प्रायश्चित्तपत्रें होतील त्यावर संमतचिन्हें करावीं ' असें काम पंडितरावांना दिलें. मंत्री हे राजाचे मुख्य मसलतगार होते. परराज्याशीं करावयाचा व्यवहार सुमंत करीत. हे सर्व अधिकार मराठी राज्याच्या जुन्या व इमानी नोकरांना संभाजीनें दिले. यामुळें कोल्हापूरच्या राज्यास मोठी बळकटी आली. साताऱ्च्या राज्यांत झालें तसें इकडे एकाच जातीचें अनिवार प्राबल्य

झालें नाहीं व मालकास कैद करणारे प्रधान कोणी उदयाला आले नाहींत. असो.

## एकी होण्याची वेळ आली.

१४. शाहू स० १७४९ सालीं मृत्यु पावला. त्याला मुलगा नसल्यामुळें तो आजारी असतांच पुढें गादीवर कोण बसणार याविषयीं तंटा सुरू झाला. सरळ हक्कानें शाहूचें राज्य कोल्हापूरकराकडे यावयास पाहिजे होतें. पण ती गोष्ट पेशव्यांना नको होती. त्यांस आपला बोलबाला छत्रपतींहूनही जास्त चालावा असें वाटत होतें. ताराबाईला शिवाजीच्या वंशाचें व त्यांतल्या त्यांत आपलें वर्चस्व ठेवावयाचें होतें. ह्मणून तिनें आपली सून जी गरोदर होती असें वर सांगितलें आहे तिचे पोटचा ह्मणून **रामराजा** नांवाचा मुलगा पुढें केला. इतके दिवस तो गुप्त होता असें ह्मणतात. शाहूची बायको सकवारबाई ह्मणून होती. तिच्या मनांत कोल्हापूरच्या राजास दत्तक घेऊन दोन्हीं राज्यें एक करावयाचें होतें. या सर्वांच्या हातांत तुरी देऊन पेशव्यांनीं सातार्‍याचें राज्य स्वतःच्या वशांत घातलें.

## पण ती फुकट गेली.

१५. या कामीं संभाजीचें पेशव्यास फार भय होतें. ह्मणून "दोनही राज्यें एक करून एकच्छत्री स्वामींचा शिक्का चालावा आणि आह्मीं शाहू महाराज यांचे कारकीर्दीप्रमाणें सेवा करून असावें" असा करार पेशव्यांनीं संभाजीस लिहून दिला होता; पण सातारा येथील आपल्या कारस्थानांत त्यानें कांहीं व्यत्यय आणूं नये एवढ्याकरितांच हा डाव होता. शाहूचा काल झाल्याबरोबर त्यानें पेशव्यांना दिलेली सनद ह्मणून एक कागद पुढें करण्यांत आला व त्यांत असा मजकूर होता कीं, सर्व राज्य पेशव्यांनीं घ्यावें! आपल्या प्रत्यक्ष वंशजास सोडून पेशव्यांना शाहूनें बोटभर चिठीवर सगळें राज्य लिहून द्यावें हें आश्चर्य आहे. ही चिठ्ठी शाहूनें लिहून दिली हें खरें असलें तरी तसें करण्याचा त्याला हक्क नव्हता हें उघड आहे. तसेंच, ती लिहून देतांना त्याचें मन विचार करण्यास असमर्थहि झालें असलें पाहिजे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ही चिठ्ठी पुढें आल्यावर अडचण काय ती सकारबाईची राहिली; कारण तिचे मनांत कोल्हापूर व सातारा एक करावयाचें होतें.

तिचा नाश करण्यास पेशव्यांनीं अत्यंत क्रूरपणाची युक्ति केली. आपला बेत बाहेर फुटूं नये ह्मणून, शाहू अंथरुणावर असतां ती ह्मणत असे कीं आपण सहगमन करणार. शाहू मरतांच तिला तिच्या शब्दांत धरण्याची खटपट सुरू झाली. तिच्या भावाला नरकाचें भय घातलें. नाचक्की होईल अशी तिला दबकावणी दिली. अशा नानातऱ्हा करून, तिची खरोखर इच्छा नसतां, तिला पेशव्यांनीं शाहूच्या प्रेताबरोबर अग्निकाष्ठ भक्षण करणें भाग पाडिलें व शिवाजी महाराजांच्या दोन वंशांचा एकोपा होण्याची सोन्यासारखी संधि मातींत घातली! मराठी राज्याचे तुकडे कायमचे झाले! यामुळें पुढें पेशव्यांना सातारच्या राजांना बाहुल्या बनविणें सोपें झालें! तसेंच पेशवे थोडा काळपर्यंत एकच्छत्री राजे बनले.*

## दत्तकास हरकती.

१६. संभाजी सन १७६० सालीं स्वर्गवासी झाले. त्यांना मुलगा नव्हता. त्यांचे सावत्रबंधु शिवाजी यांच्या

---

* India on the Eve of the British Conquest by Owen. pp. 258–259 यांत या शोचनीय प्रसंगाचें हृदयद्रावक वर्णन दिलें आहे.

मुलाला साताराच्या गादीवर बसविलें होतें. ह्मणून संभाजीची बायको जिजाबाईसाहेब इनें खानवट येथील शरीफजी भोसले यांच्या घराण्यांतील एका मुलास दत्तक घेण्याचें ठरविलें. पेशव्यांनीं यास अडथळा सुरू केला; पण जिजाबाईच्या दीर्घ खटपटीनें १७६२ सालीं दत्तविधान पार पडलें. मुलाचें नांव **शिवाजी** असें ठेविलें व तो लहान असल्यानें बाई कारभार पाहूं लागल्या. हेंहि राज्य पेशव्यांच्या कबजांत गेलें नाहीं, ह्मणून लोकांस फार आनंद झाला.

## जीजाबाईचा कारभार अथवा स्त्रीराज्य.

१७. बाईंनीं प्रथम बावडेकर अमात्यांना राज्यकारभार पाहण्यास सांगितलें. 'स्त्रीबुद्धि अशाश्वत, सबब हें काम आपण करीत नाहीं' असें त्यांनीं उत्तर दिलें. तेव्हां रागावून बाईंनीं येसाजी शिंदे सुभेदार यांस कारभारी नेमिलें, व गंगू, रंगू, भागू, नागू व लिंगू अशा कुणबिणींकडे मामलेदाऱ्या दिल्या !

## इंग्रजांची पहिली सलामी.

१८. सन १७६६ सालीं इंग्रज व कोल्हापूरकर यांचा पहिला तह झाला. त्याअन्वयें, इकडे व्यापार करण्यास

इंग्रजांना परवाना मिळाला. लोखंडी व तांब्याचें सामान व लोंकरी कापड इकडे आणून इंग्रज लोक विकीत असत. एकमेकांनीं एकमेकांच्या नोकरांना आसरा देऊं नये असा एक ठराव या तहांत होता. प्रसंगीं त्यांनीं यांना व यांनीं त्यांना सैन्याची मदत करावी असेंहि ठरलें.

## पेशव्यांस पश्चात्ताप होतो!

१९. चिकोडी व मनोळी प्रांत कोल्हापूरकरांकडून जबरदस्तीनें पेशव्यांनीं घेतले होते; ते परत देण्याचें एका तहांत ठरलें असूनही दिले नव्हते. इतक्यांत माधवराव पेशवे हा तरुणपणांतच अतिशय आजारी पडला. (सन १७७२) तेव्हां त्यास वाईट वाटून, शास्त्रीलोकांस त्यानें जवळ बोलावून विचारिलें कीं "पेशव्यांच्या वंशाचा असा नाश कां होऊं लागला?" 'आपले धनी जे शिवाजीमहाराजांचे वंशज, त्यांना तुह्मीं अटकेंत ठेविलें व त्यांशीं तुह्मीं कपट करितां, यामुळें तुमचा क्षय होतो' असें शास्त्रयांनीं उत्तर दिलें. हें ऐकून माधवरावास वाईट वाटलें व त्यानें चिकोडी व मनोळी कोल्हापूरकरांस देण्याचा हुकूम केला.

## पटवर्धनांची धुंडाई. मठ जाळला!

२०. जिजाबाई स० १७७२ सालीं स्वर्गवासी झाल्या; तेव्हां महाराज १५ वर्षांचे होते. ह्मणून येसाजी शिंदे हेच पुढें कारभार पाहूं लागले. यावेळीं कोल्हापूरकरांना त्रास देण्यासाठीं नाना फडणीस वगैरे पुणेकर मुत्सद्यांनीं पटवर्धन नांवाच्या सरदारांना मिरजेस जहागीर देऊन पाठविलें. त्यांची व कोल्हापूरकरांची झटपट सुमारें तीस वर्षें चालू राहिली. स० १७७५ सालीं इकडचीं खेडीं लुटण्यास त्यांनीं आरंभ केला. भोजजवळ त्यांचा छत्रपतींनीं मोड केला व पटवर्धनास पळवून लाविले. थोडे दिवसांनीं कारभारी शिंदा दुसरीकडे अडचणींत आहे असें पाहून पटवर्धनांनीं कोल्हापुरास वेढा घातला. तेव्हां भीतीनें आपला सर्व ऐवज लोकांनीं श्रीशंकराचार्य स्वामींचे मठांत ठेविला. तरी मठाची दिक्कत न बाळगितां, पटवर्धनांनीं तो लुटून जाळून टाकिला! स्वामी ब्राह्मण असले तरी देशस्थ असल्यामुळें पटवर्धनांना त्यांची किंमत वाटली नाहीं. या अपमानामुळें राग येऊन स्वामींनीं जिवंतपणींच शिरगांव येथें समाधि घेतली.

## कोल्हापूरचा वेढा.

२१. सन १७७६ सालीं प्रसिद्ध शिपायी महादजी शिंदे हे कुलस्वामी ज्योतिर्लिंगा ( जोतीबा ) च्या दर्शनाचें निमित्त करून आले व त्यांनीं अकस्मात् कोल्हापुरास वेढा दिला. इकडे कांहींच तयारी नव्हती. यामुळें कोल्हापूर अगदीं जेरीस आलें. हैदरखान नांवाच्या म्हैसूरच्या नबाबाची व पेशव्यांची यावेळीं जुंपली होती. शिंदे हे पेशव्यांच्या तर्फेचे. ह्मणून हैदराची मदत कोल्हापूरकरांनीं मागितली. पण ती येण्याचे अगोदरच तह झाला. १५ लक्ष रुपये नुकसानीचे शिंद्यास द्यावे लागले आणि पेशव्यांच्या शत्रूशीं सख्य करावयाचें नाहीं असेंही लिहून द्यावें लागलें. ( सन १७७७. )

## अकीवाटचा वेढा.

२२. असा तह झाला तरी अकीवाटला वेढा देऊन पटवर्धनांनीं कुरापत काढलीच. तेथील लोकांनीं अतिशय शौर्यानें किल्ला लढविला. पण अखेर दाणागोटा कमी पडून किल्ला पटवर्धनांच्या आहारीं गेला.

## माघ परत घेतलें.

२३. सन १७७९ पासून महाराज थोडा थोडा कारभार पाहूं लागले. तरी येसाजी कारभारी होतेच. पेशव्यांनीं

छत्रपतींचे जे अपमान केले होते त्यांचें उट्टें काढण्याकरितां त्यांनीं म्हैसूरचे हैदर व पेशव्यांचे चुलते राघोबादादा यांच्याशीं संधान बांधिलें. यामुळें घाबरून जाऊन इ० सन १७८१ मध्यें पेशव्यांनीं महादजी शिंद्याशीं केलेला तह रद्द करून दिला आणि पटवर्धनांनीं घेतलेलीं सर्व ठाणीं परत देवविलीं. येसाजी शिंदे यांच्या हुशारीनें झालेली नुकसान भरून निघाली. पुढें दोन वर्षांनीं शिंदे मृत्यु पावले.

## अळत्याची लढाई.

२४. यानंतर थोडे दिवस गेले नाहींत तोंच पटवर्धन पुनः गडबड करूं लागले. परशुरामभाऊ नांवाचा त्यांचा पुढारी होता. तो शूर परंतु अविवेकी होता. त्यानें १० हजार लोकांनिशीं कोल्हापूरकरांवर हल्ला केला. अळतें येथें महाराजांची व त्याची लढाई होऊन त्यांत पटवर्धनांचा पुरा मोड झाला. ते जीव घेऊन पळूं लागले. रत्नाकरआप्पा नांवाच्या कोल्हापूरकरांच्या कारभाऱ्यानें त्यांचा पाठलाग केला व शिरगांवच्या खिंडींत त्यांस गाठून त्यांच्या तोफा हस्तगत करून घेतल्या. परशुरामभाऊचा मुलगा रामचंद्रपंत

या लढाईंत जखमा लागून कैद झाला. महाराजांनीं मोठ्या उदार मनानें त्याच्या जखमा दुरुस्त केल्या व तो नीट झाल्यावर त्यास बापाकडे जाण्यास मोकळीक दिली. महाराजांचा हा थोरपणा पाहून रामचंद्रपंतानें शपथ घेतली कीं, आपण **राजमंडळा**वर कधीं हत्यार उचलणार नाहीं आणि बापासही तसें करूं देणार नाहीं. अशी शपथ वाहून तो निघून गेला.

## उपकाराची फेड.

२५. पण परशुरामभाऊ निष्ठुर व अनुदार होता. मुलानें घेतलेल्या आणाशपथा त्यानें वाऱ्यावर फेंकून दिल्या व पुनः कोल्हापुरावर चाल करून उचगांवच्या माळावर तळ दिला. बरेच दिवस लढाई होऊन छत्रपतींनीं १० लक्ष रु० देण्याचें ठरलें. त्या रकमेच्या फेडीसाठीं चिकोडी व मनोळी लावून देण्यांत आले. परंतु हा प्रकार फार दिवस टिकला नाहीं. महाराजांच्या आज्ञेवरून भूधरगड नांवाचा किल्ला हैबतराव गायकवाड यानें मोठ्या शिताफीनें घेतला. लवकरच चिकोडी व मनोळी महाराजांनीं परत घेतली. गोकाक, कित्तूर, हुबळीं वगैरे ठिकाणची खंडणीही त्यांनीं दुसरे वर्षीं वसूल केली.

## नाना फडणीस काळजींत पडतात.

## पट्टणकुडींची लढाई.

२६. महाराजांच्या पराक्रमाच्या या बातम्या ऐकून पेशव्यांचा कारभारी नाना फडणीस यास फार चिंता उत्पन्न झाली. एक मोठें सैन्य देऊन परशुरामभाऊला त्यानें कोल्हापूरकरांवर रवाना केलें. पट्टणकुडीच्या रानांत त्याची व महाराजांची गांठ पडली. भाऊंनीं लढाई देण्यास सोयीची जागा पाहून तळ दिला होता. पण त्यांचा गर्व अगदीं अपरंपार. लढाईचें तोंड लागलें तरी स्वारी बुद्धिबळें खेळत होती. महाराजांनीं आपल्या सैन्याच्या चार टोळ्या केल्या. एकींवर सेनापति व विश्वासराव गायकवाड असून, ती दक्षिणेच्या बाजूला उभी होती. पश्चिमेच्या टोळीवर महाराज, हिंमतबहादूर व जतनमुल्क होते. उत्तरेची बाजू रत्नाकरपंतांनीं सांभाळिली. पूर्वेकडे कदमांचें पथक उभें केलें होतें. अशा बंदोबस्तानें महाराजांनीं हल्ला चढविला. प्रथम सेनापति व कदम यांच्या टोळ्यांशीं दोन हात झाले. त्यांत तोफांच्या गोळ्यांनीं त्यांचा फार नाश झाला. लोक माघार घेण्याच्या बेतांत आले. तेव्हां

हिंमतबहादरांनीं महाराजांस पुढें व्हावयास सल्ला देऊन लोकांस हिंमत दिली. त्यामुळें पटवर्धनांच्या सैन्याचा धुव्वा उडूं लागला. मग कोठें भाऊ शुद्धीवर येऊन लढाईंत शिरले! बरोबर रामचंद्रपंतही लढण्यास होतेच! राजमंडळावर हत्यार उचलणार नाहीं ह्मणून शपथ घेणारे पंत हेच! या लढाईंत त्याचा बाप परशुरामभाऊ चीत होऊन पडला. पण त्याला तसाच टाकून, रामचंद्रपंत पळून गेला! महाराजांनीं मात्र भाऊच्या शवास यथाविधि ब्राह्मणाकडून अग्नि देवविला. ही गोष्ट स. १७९९ सालीं घडली.

## कोल्हापुरास पुनः वेढा.

२७. या फजितीनें चिडून जाऊन पटवर्धनांनीं आणखी एक सैन्य तयार केलें. पेशव्यांनीं मदतीसाठीं शिंद्याची कवाईत शिकविलेली पलटण दिली. अशा तयारीनें कोल्हापूरच्या उत्तरेच्या चोफाळ्याच्या माळावर तळ देऊन पटवर्धनांनीं कोल्हापूरच्या किल्ल्यास वेढा घातला. रत्नाकरपंतांनीं मोठ्या शिताफीनें महाराजांस पन्हाळगडावर रवाना केलें. किल्ल्याच्या रक्षणाचा बंदोबस्त त्यांनीं चोहोंकेर डोळ्यांत तेल घालून केला. हा वेढा स. १८०० च्या

सुरवातीस दोन महिने पडला होता. बाहेरून महाराजांच्या हाताखालचे लोक पन्हाळगडावरून खालीं उतरून वरचेवर पटवर्धनांच्या लोकांशीं दोन हात करीतच. अशा एका चकमकींत विश्वासराव गायकवाड पटवर्धनांच्या हातीं लागले. ज्या रामचंद्रपंतास महाराजांनीं जीवदान दिलें होतें, ज्यानें कोल्हापुराविरुद्ध लढणार नाहीं अशी आणभाक केली होती आणि पट्टणकुडीच्या मैदानांत बापास टाकून जो पळून गेला होता, त्यानें विश्वासरावाच्या तोंडांत, नाकांत व कानांत दारू ठेचून उडविली आणि त्यास अशा रानटी रीतीनें मारिलें. तट चढून जाण्याकरितां शिंद्याची पलटण एकदां खूप जोर करीत होती. दगड व बंदुका मारून त्यांचा हल्ला रत्नाकरपंतांनीं परतविला; त्यांत शिंद्याचे २७०० लोक व २।३ साहेब पडले. ही बातमी ऐकून शिंदे तह करण्यास तयार झालाच होता. इतक्यांत कागलकर सर्जेराव घाटगे यांनीं शिंद्यांशीं बोलणें लाविलें कीं, शिवाजीच्या वंशजाशीं असें वैर मराठा सरदारानें मांडू नये. शिंदे यांना सर्जेराव यांची कन्या वरण्याची फार इच्छा होती. ह्मणून त्यांनीं ही भीड ऐकिली. तह होऊन लौकरच वेढा उठविण्यांत आला.

## निपाणकरांचा उपद्रव.

२८. याच सुमारास आपासाहेब निपाणीकर देसाई यांचा या प्रांतांत दंगा सुरू झाला. तो मोठा शूर व धाडसी होता; पण तितकाच क्रूर व अविवेकी होता. पेशव्यांनीं त्यास फूस दिल्यामुळें तो कोल्हापूरकरांचीं ठाणीं घेऊं लागला. तेव्हां कागलाजवळ सांवगावला स. १८०७ सालीं लढाई झाली. त्यांत महाराजांना जखम लागून माघार घ्यावी लागली; कारण त्यांच्या सैन्यांत फितुरी झाली होती. पुढें २।३ वर्षं हें भांडण चालू होतें. अखेर इंग्रजांच्या मध्यस्थीनें तह होऊन सन १८१२ सालीं तंटा मिटला.

## शिवाजी महाराजांचा स्वर्गवास.

२९. या वर्षींच शिवाजीमहाराजांचा काळ झाला. ते मोठे शूर व उदार होते. प्रजेच्या सोयीकडें त्यांचें लक्ष असे. पन्हाळा तलाव मोठा करून त्यांनीं लोकांस पाण्याची सोय करून दिली. त्यांस संभाजी व शहाजी असे दोन १२ वर्षें वयाचे पुत्र होते. त्यापैकीं संभाजी ९ महिन्यांनीं वडील असल्यामुळें तेच गादीवर बसले.

# दुसरे संभाजी ऊर्फ आबासाहेबमहाराज.

[ सन १८१३—१८२१ ]

## शांततेचा काळ.

३०. यांच्या कारकीर्दीपासून कोल्हापूरच्या इतिहासास नवें वळण लागलें. पेशवे यांचा अधिकार इंग्रजसरकारांनीं सन १८१८ सालीं नाहींसा केल्याकारणानें कोल्हापूरराज्याचे शत्रु नाहींसे झाले. या पूर्वींच्या काळांत पेशव्यांचे सरदार व मित्र यांच्याशीं कोल्हापूरकरांचें नेहमीं भांडण चालत असे. तो प्रकार सन १८१८ नंतर अजीबात बंद झाला. त्या पूर्वीं थोडे दिवस, पेशव्यांचे सरदार पटवर्धन आणि पेशवे यांचें सूत जमतच नव्हतें. यामुळें पटवर्धनांचा उपद्रव कमीच होता. अशा प्रकारें राज्यांत जी शांतता स्थापन झाली तिचा महाराजांनीं फायदा घेऊन राज्यव्यवस्था चांगली केली. पुंडलोकांच्या लुटालुटी बंद केल्या. कोणी गुन्हा केल्यास त्याला विस्तवावरून चालवीत असत तें बंद करण्यांत आलें. त्यांनीं वसुलाचा बंदोबस्त ठेविल्यामुळें खजीन्यांत शिल्लक पडूं लागली. चिकोडी व मनोळी तालुके निपाणकरांकडून कोल्हापूरकरांस इंग्रजांनीं देवविले. या-

प्रमाणें सर्व राज्य भरभराटीस येत असतां मोहिते नांवाच्या शिपायानें त्यांचा सन १८२१ सालीं जुलै महिन्यांत खून केला. त्यावेळीं त्यांचें वय फक्त २१ वर्षांचें होतें. या खुनामुळें कोल्हापूरचे राज्याची फार नुकसान झाली.

# शहाजी ऊर्फ बुवासाहेब महाराज.

(सन १८२१—१८३७.)

## चिकोडी व मनोळी गमावलीं.

३१. संभाजीमहाराजांमागून त्यांचे सावत्र बंधु बुवामहाराज गादीवर बसले. हे स्वभावानें दिलदार व धाडसी होते, पण तसेच भोळसरही होते. त्यांचे कान फार हलके होते. अशा राजाचे कारभारी चांगले असावयाचे नाहींत. वाईट लोकांचीच डाळ त्यांचेजवळ शिजावयाची. त्यांतून राज्यांत दोन फळ्या पडल्या. एका फळीस सुंदराबाईसाहेब ह्मणजे संभाजीमहाराजांच्या पत्नी या होत्या. बुवासाहेब, कागलकर, सरदार पारसनवीस वगैरेनीं महाराजांना मारविलें असा त्यांस संशय होता. त्यांच्या बाजूस भाऊमहाराज आणि दिनकरराव गायकवाड हे होते. या दोन

पक्षांच्या वादांत राज्याची फार नासाडी झाली. महाराजांचीं सुभाना निकम नांवाच्या हुजऱ्यावर बहाल मर्जी होती. त्याच्या तंत्रानें ते वागत. त्याला घेऊन आसपासचीं गांवें लुटण्यास त्यांनीं आरंभ केला. १८२४ सालीं कित्तूरकर यांनीं बंड केलें. त्यांत इंग्रजांविरुद्ध महाराजांचें अंग होतें असा इंग्रजांना संशय होता. तशांत महाराजांनीं कागलकरांना जहागिरींतून हांकून दिलें. यामुळें इंग्रजांनीं १८२५ सालीं बंदोबस्तासाठीं सैन्य पाठविलें. तेव्हां भिऊन दुसरे वर्षी महाराजांनीं इंग्रजाशीं तह केला. आपलें सैन्य कमी करूं, कागलकर व इचलकरंजीकर यांना त्रास देणार नाहीं, आणि आजपर्यंत ज्या लोकांची "गांवें वगैरे जप्त करून व इजा देऊन" नुकसान केली त्यांची भरपाई करण्याकरितां चिकोडी व मनोळी इंग्रजांकडे गहाण ठेवूं, असें महाराजांनीं कबूल केलें. पुढच्या सालीं पुणे येथें गव्हर्नरसाहेबांकडे जाऊन हे दोन प्रांत परत मिळविण्याची त्यांनीं खटपट केली; पण तींत यश आलें नाहीं.

## अधिकार कमी झाला.

३२. महाराजांची अव्यवस्था अजून संपली नाहीं. पुण्याहून येतां येतां गांवें लुटण्याची त्यांनीं

सुरवात केली. कागल, इचलकरंजी व कापशी येथील जहागिरदारांना त्रास देऊं लागले. वैष्णव स्वामींनीं हत्ती दिला नाहीं ह्मणून त्यांस अटकाव केला. अशा कागाळ्या ऐकून इंग्रजांचें पुनः सैन्य आलें व त्यांनीं महाराजांकडून करार करून घेतला कीं [ १ ] महाराजांनीं फक्त ४०० स्वार व ८०० पायदळ ठेवावें; [ २ ] चिकोडी मनोळी परत मागूं नये; [ ३ ] अकीवाट येथें पुंड फार आहेत, सबब तो गांव इंग्रजांकडे रहावा; [ ४ ] कोल्हापुरांत इंग्रजांची फौज राहील त्याचा खर्च महाराजांनीं द्यावा आणि [ ५ ) इंग्रजांच्या पसंतीचा कारभारी नेमावा.

## आणखी फजीति.

२३. या तहाप्रमाणें नारायणराव राजाज्ञे यांस पहिले कारभारी नेमिलें. पण महाराजांचे बदसल्लागार अजून जोरांत होते. त्यांनीं इंग्रजांचा अखबरनवीस ( वकील ) यांस वश करून घेऊन महाराजांना पूर्ण मुखत्यारी देवविण्याची खटपट चालविली. त्यासाठीं स्वारी बेळगांवांस गेली; पण तेथें साहेबाच्या भेटीस गेल्या वेळीं शिर्के यांच्या खिशांतील पिस्तुल उडालें! साहेबांस जास्तच संशय आला व ‘ बेळ-

गांवास डंका नौबत न वाजवितां परत जा ' असें त्यांनीं सांगून महाराजांस परत पाठविलें. तरी अखबरनवीस रामराव यांनीं खटपट करून १८३१ सालीं महाराजांना मुखत्यारी देवविली. पण महाराज व त्यांची प्रजा यांचें दुर्दैव अद्याप संपलें नव्हतें.

## आणखी बेबंदशाही.

३४. पुढच्या ७ वर्षांत राज्याची अव्यवस्था वाढतच गेली. चिकोडी–मनोळी जाऊन ३ लाखांचा वसूल कमी झाला व ५ लाखांचा मुलुख हातीं राहिला. पण खर्च पूर्वीप्रमाणेंच चालू होता. त्यामुळें कर्ज वाढलें. तें फेडावें ह्मणून गांवें लुटण्याची खटपट महाराज करूं लागले. इकडे गांवें इनाम करून लोकांस देण्याचाहि धुमधडाका चालूंच होता. अशीं ८० गांवें इनामांतच गेलीं ! दगडी नगारखाना बांधवून आणखी कर्ज केलें. याप्रमाणें खजीन्याची नासधुस करून त्यानीं लुटालुटीनें प्रजेस हैराण केलें. याचा परिणाम त्यांचे पश्चात सर्व राज्यांत जाणवला. त्याची हकीकत पुढें येईल.

# शिवाजी ऊर्फ बाबासाहेबमहाराज.

## दोन तट.

३५. बुवामहाराज पंढरपुरास यात्रेकरितां गेल्यावेळीं वाटेंत सन १८३८ सालीं परलोकवासी झाले. त्यावेळीं तारासाहेब यांच्या पोटीं शिवाजी आणि राजाराम असे दोन पुत्र व आऊबाईसाहेब व बाळाबाईसाहेब अशा दोन कन्या होत्या. नर्मदाबाईसाहेब यांच्या पोटीं चिमासाहेब नामक पुत्र होता. पण त्या पूर्वींच वारल्या असून चिमासाहेब हे आबासाहेबांच्या पत्नी दिवाणसाहेब यांच्याजवळ रहात असत. बुवासाहेब वारल्याबरोबर ताराबाईसाहेब यांचा एक व दिवाणसाहेब यांचा एक असे दोन पक्ष होऊन अधिकारासाठीं भांडणें सुरू झालीं. तीं मोडावीं ह्मणून अखबरनवीस यांच्या सल्लयानें एकेका पक्षाचे दोन दोन कारभारी नेमून त्यांनीं मिळून कारभार चालवावा असें ठरविलें. पूर्वींप्रमाणें जमा ३ लाख व खर्च ४॥ लाख असा प्रकार करणार नाहीं असें या कारभाऱ्यांनीं कबूल केल्यामुळें त्यांस इंग्रजांनीं मान्यता दिली.

## गायकवाडांचा उन्मत्तपणा.

३६. पण ही व्यवस्था सुरळीत चालली नाहीं. दिवाणसाहेबांच्या पक्षाचे कारभारी दिनकरराव गायकवाड प्रति महाराज होऊन लोकांचे मुजरेसुद्धां घेईनात! दुसऱ्या कारभाऱ्यांचें कांहीं एक चालेना. गायकवाडांचा कारभार ह्मणजे जुलुमाचा कळसच होता. त्यांनीं प्रथम आपला पगार दुप्पट वाढविला. खासगी खर्च उंटाच्या पावलानें पुढें चालला. लाच घेऊन सररास न्याय देण्यांत येऊं लागला. राज्याचा हिशेब कोणीच ठेवीनात. जैन व लिंगायत यांचीं लग्नें ब्राह्मणांकडून झालीं पाहिजेत ह्मणून जुलूम चालला. चौकशीशिवाय लोकांस तुरुंग दाखवूं लागले. खजिन्यांतून पैका लांबविला जाऊं लागला. इंग्रज खुलासा मागूं लागले तर त्यांना उत्तरसुद्धां कारभारी देईनात. तेव्हां कंटाळून मुंबईसरकारानें रीव्हज् नामक साहेबांस कोल्हापूरच्या बंदोबस्तासाठीं पाठविलें.

## दाजी पंडितांचा अंमल.

३७. एकंदर तपास करितां, कोल्हापूरचे बडे लोक राज्यकारभार करण्यास नालायख आहेत, असें साहेबांस दिसून

आलें. अखेर १८४४ सालीं दाजीपंडित नांवाच्या एकास कारभारी नेमून मुंबईसरकारानें पाठविलें. हे गृहस्थ इंग्रजी मुलखांतील नोकर असून मोठे करारी व निस्पृह होते. त्यांचा कडक अंमल येथील खोडसाळ मंडळीस सहन होईना. मामलेदार यांनीं कसें काम करावें याविषयीं त्यांनीं प्रथम नियम केले. त्यांजकडून हिशेब वेळच्या वेळीं घेण्याची त्यांनीं सुरवात केली. यापूर्वीं खर्चासाठीं एकेका खात्यास एकेक तालुका तोडून दिला होता. तसें न करितां सर्व तालुक्यांच्या मामलेदारांनीं सर्व वसूल हुजूर खजिन्यांत जमा केला पाहिजे असें त्यांनीं ठरविलें. यामुळें वसुलांतील लबाड्या कमी झाल्या. मानकरी व शिलेदार यांच्याकडूनहि ते नोकरी घेऊं लागले. प्रत्येक किल्ल्यास वेगळा मामलेदार पूर्वीं होता; त्याऐवजीं दोन तीन किल्ल्यांस त्यांनीं एकेक मामलेदार नेमिला. यायोगानें गडकरी फार चिडले. आपला किल्ला ह्मणजे एक वेगळें राज्यच असें त्यांनीं वाटत होतें. नव्या व्यवस्थेनें हें आपलें राज्य दुसऱ्याच्या ताब्यांत गेलें असें त्यांना वाटलें.

## पंडिताविरुद्ध बंड.

३८. हा असंतोष वाढत जाऊन अखेर सामानगड व भूधरगड येथील लोकांनीं बंडाचें निशाण उभारलें. थोडेच दिवसांत इतर किल्ले त्यांना सामील होऊन दाजीपंडितांना बंडवाल्यांनीं कैद केलें. इतक्यांत इंग्रजांच्या फौजेनें येऊन येथील बंडावा मोडून टाकिला व पंडितांस सोडविलें. या वेळीं कोल्हापूरचें राज्य खालसा करण्याचा विचार चालू होता; पण मे० रीव्हज् यांच्या शिफारसीनें सरकारांनीं हें राज्य कायम ठेविलें. मात्र संस्थानची सर्व व्यवस्था मेजर ग्रॅहॅम् नामक साहेबांच्या हातीं देण्यांत आली. ही गोष्ट १८४५ सालीं घडली.

## नवीन कालाचा आरंभ.

३९. यापूर्वीं सुमारें दीडशें वर्षें कोल्हापूरची गादी स्थापन झाली. तेव्हांपासून पहिल्या शंभर वर्षांत पेशव्यांच्या मत्सरामुळें कोल्हापूरकरांना सदोदीत लढाया कराव्या लागत. त्यामुळें प्रजेला शांततेचें सुख मिळालें नाहीं. पुढें पेशवाई बुडाली तरी कोल्हापुरास दुफळ्या होऊन भांडणें सुरू झालीं व लोकांना होणारा त्रास पूर्वीसारखाच

कायम राहिला. येथून पुढें इंग्रजी राज्याचें कृपाच्छत्र देशभर व त्यांतल्या त्यांत आमच्या संस्थानावर पसरलें गेलें. पूर्वीचे दंगेधोपे आतां बंद झाले. राज्यांतील अव्यवस्था कमी झाली. प्रजेला हरतऱ्हेनें सुख होऊं लागलें. याबद्दलची आतां हकीकत द्यावयाची आहे. आतां लढायांचा काळ संपला, तरी जिकडे तिकडे बेबंदशाही पसरली होती. तिचें प्रथम थोडक्यांत वर्णन देऊं. ह्मणजे पूर्वीच्या काळाची स्थिति लक्षांत येईल.

## पूर्वींची लोकस्थिति.

४०. सरकारी खजीन्याची स्थिति पूर्वीं सांगितली आहेच. राजास कर्ज असलें अथवा उत्पन्नापेक्षां त्याचा खर्च जास्त झाला ह्मणजे प्रजेला पिळून काढण्यास तो आरंभ करितो. या नियमाप्रमाणें राजा, जहागीरदार, सरदार, इनामदार हे सर्व मिळून रयतेकडून होईल तेवढा पैसा उकळीत असत. एकंदर ५–५॥ लक्ष लोकांपैकीं १४ हजार इनामदार होते. ९ हजार ब्राह्मणवस्तीपैकीं ७ हजार लोक ऐतखाऊ होते. संस्थानांत ११०० गुलाम होते. त्यांना कोठून तरी विकत आणिलेलें असे; किंवा परपुरुष सेवन

केलेल्या बायकांना गुलाम करीत असत. पटकीची व देवीची साथ दरसाल येई. त्यामुळें लोक प्राणास मुकत व गांवें उध्वस्त होत. सर्व लोकांच्या उपयोगी शाळा यापूर्वी ऐकिवांतसुद्धां नव्हत्या. मोठमोठ्या इनामदारांना सह्यासुद्धां करितां येत नव्हत्या. पत्रें लिहिणारा कारकून त्यावेळीं फार शहाणा समजला जात असे. फक्त ब्राह्मणांच्या थोड्या पाठशाळा होत्या व त्यांत ४०० मुलें शिकत होतीं.

## जुनी न्यायपद्धति.

४१. फौजदारी गुन्ह्याबद्दल त्या वेळच्या लोकांच्या समजुती विलक्षण होत्या. खुद्द महाराज दरवडे घालीत असत. मग त्यांत गुन्हा तो काय होणार ? बहुतेक अपराधाबद्दल नुसता दंड देऊन सुटतां येत असे. यायोगानें श्रीमंत, चोर, लुटारू लोकांना कांहींच अडचण पडत नसे. एकंदर गुन्हेगारांपैकीं सहावा हिस्सा ब्राह्मणांचा होता असें १८४६–५२ सालच्या हकीकतीवरून समजतें.

## सुधारणेस आरंभ.

४२. मेजर ग्रॅहम् साहेबांनीं सुधारणेचा पाया घातला. त्यांनीं शाळा सुरू केल्या. त्यांत लवकरच सर्व जातींचीं

मुलें शिकूं लागलीं. १८४५ पासून १८६३ पर्यंत राज्य-व्यवस्था इंग्रजी अंमलदारांकडे होती. एवढ्या मुदतींत संस्थानचें कर्ज २० लक्ष होतें तें ५॥ लक्ष झालें. कोल्हापुरास वाचनमंदिर व मुलींची शाळा याच कारकीर्दीत प्रथम सुरू झाली. पहिला सार्वजनिक दवाखाना १८४८ सालीं उघडण्यांत आला. सडका केल्या. तारऑफीस उघडलें. वसूल ५॥ लक्षांचा ७॥ लक्ष झाला. फाळ्याच्या बदली पूर्वीं पिकाचा हिस्सा सरकार घेत असे. यामुळें रयतेवर गांवकर फार जुलूम करूं शकत. तो फाळा नक्तीनें घ्यावा असें आतां ठरलें. सरकारचें खासगी खातें इंग्रजांनीं वेगळें केलें व त्यासाठीं ८० हजार रु० दरसालचे तोडून दिले. एकाच नमुन्यांचीं वजनें व मापें त्यांनीं सर्व संस्थानांत सुरू केलीं. महाराजांचे शिक्षणाची बरोबर तजवीज केल्यामुळें, त्यांना इंग्रजी बोलतां येऊं लागलें.

## मर्यादित मुखत्यारी.

४३. १८५७ सालीं जें देशभर बंड झालें, त्यांत महाराजांचे बंधु चिमासाहेब यांचें अंग असावें असा इंग्रजांना संशय येऊन त्यांनीं त्यांस कराचीस नेऊन ठेविलें. तेथें

१८६९ सालीं ते मृत्यु पावले. महाराजांबद्दल शंका आली नाहीं, ही फार सुदैवाची गोष्ट होय. महाराजांचें शिक्षणही बरें झालें होतें. ह्मणून १८६३ सालीं कांहीं मर्यादा घालून त्यांस मुखत्यारी दिली. त्या मर्यादा अशा कीं— ( १ ) जरूरीच्या प्रसंगीं इंग्रज देतील तो सल्ला महाराजांनीं मान्य केला पाहिजे ; ( २ ) खासगी व दौलत यांचा हिशेब वेगळा ठेविला पाहिजे ; ( ३ ) जहागीरदारांचे हितसंबंधास महाराजांनीं बाध आणूं नये ; व ( ४ ) पोलिटिकल एजंटचा आणि इन्फंट्रीचा खर्च महाराजांनीं द्यावा.

## कर्ज फिटलें.

४४. याप्रमाणें मुखत्यारी मिळाल्यावर महाराजांनीं सर्व कर्ज फेडून टाकिलें. त्यांची वागणूक चांगली होती. ह्मणून त्यांना १८६६ सालीं इंग्रजांनीं के. सी. एस्. आय्. ही पदवी दिली. पण मुतखड्याच्या विकारानें त्यांस याच सालीं देवाज्ञा झाली. त्यांचे मागें कोणी पुत्र नसल्यामुळें त्यांच्या थोरल्या बहिणीचे चिरंजीव श्री० नागोजीराव पाटणकर यांस दत्तक देऊन दुसरे **राजाराम महाराज** या नांवानें त्यांस गादीवर बसविलें.

### तोंडास आलेला घांस खालीं पडला.

४५. राजाराम महाराज या वेळीं १६ वर्षांचे होते. त्यांचें शिक्षण उत्तम प्रकारचें झालें होतें. १८७० सालीं फेब्रुवारी महिन्यांत त्यांच्या हातानें हायस्कूलच्या इमारतीचा पाया घालण्यांत आला. या वेळीं त्यांना मुखत्यारी मिळावयाची होती. पण ती घेण्यापूर्वीं विलायत पाहून यावें असें त्यांना वाटलें. तिकडे जाऊन परत येत असतां इटली देशांत त्यांना विकार होऊन त्यांचें देहावसान १८७० च्या नोव्हेंबरांत फ्लॉरेन्स शहरीं झालें. हें ऐकून सर्वांस फार दुःख झालें. लोकांनीं त्यांचें स्मारक म्हणून वर्गणी गोळा केली व शिष्यवृत्त्या स्थापन केल्या. हायस्कुलास व कॉलेजास त्यांचेंच नांव देण्यांत आलें.

## दुर्दैवी शिवाजी महाराज.

(१८७१—१८८३.)

४६. राजाराम महाराजांस संतति नसल्यामुळें, खानवटकर घराण्यांतील एका मुलास दत्तक घेऊन दुसरे शिवाजी या नांवानें त्यांस गादीवर बसविलें. त्यांना विद्या प्राप्त व्हावी

अशी पुष्कळ खटपट सरकारांनीं केली; परंतु अनेक कारणां-मुळें त्यांना वेड लागलें व त्यांतच ते १८८३ सालीं मृत्यु पावले. त्यांना पुत्रसंतति नसल्यामुळें, श्री० जयसिंगराव आबासाहेब घाटगे कागलकर यांचे वडील चिरंजीवास दत्तक घेऊन, त्यांचें नांव शाहू महाराज असें ठेवण्यांत आलें. श्री० आबासाहेब कागलकर हे बाबासाहेब महाराजांच्या कनिष्ठ भगिनीचे पुत्र होत.

## या दोन कारकीर्दींतील राज्यकारभार.

४७. राजाराम व शिवाजी महाराज हे दोघेही अल्प-वयांत मृत्यु पावल्यामुळें त्यांच्या कारकीर्दींत सर्व व्यवस्था पोलिटिकल एजंट हे एका कारभाऱ्यामार्फत पहात असत. त्यांत मे० अंडर्सनसाहेब व रा० ब० बर्वे कारभारी हे विशेष महत्वाचे आहेत. त्यांनीं येथील व्यवस्थेंत बरीच सुधारणा केली. बाबासाहेबांच्या कारकीर्दीचे अखेरीस ९ लक्षांपर्यंत वसूल होत होता. तो १८८२ सालीं १७ लक्ष झाला. पूर्वीं ज्या लबाड लोकांनीं इनामें मिळविलीं होतीं तीं खालसा करून ७५ हजारांचें उत्पन्न वाढलें. जंगल, स्टांप, नोंदणी, अबकारी वगैरे नवीं खातीं उत्पन्न होऊन वसूल

वाढला. जमिनीच्या तरमाची तपासणी झाली. अशा प्रकारें वसूल वाढला. त्यांतून पुष्कळ लोकोपयोगीं कामें करण्यांत आलीं.

## सुधारणेचीं कामें.

४८. राजाराम हायस्कूल, रंकाळा तलाव, टाऊनहॉल, आल्बर्ट एडवर्ड इस्पितळ वगैरे अनेक सुंदर इमारती यावेळीं बांधण्यांत आल्या. कचेऱ्या, शाळा व पूल चोहोंकडे बांधण्यांत आले. याकरितां बारा वर्षांत ४९ लक्ष रु० खर्च झाले. १८७२ सालीं १०० शाळा होत्या त्या दहा वर्षांनीं १५० झाल्या. मात्र या शाळांचा ब्राह्मणांनीं जसा फायदा घेतला तसा इतरांनीं घेतला नाहीं. १८५० त शिकणारे ब्राह्मण शेंकडा ५॥ होते. १८८२ सालीं त्यांच्यांत शिकणारे शेंकडा ७९ झाले. तेंच त्या वर्षी लिंगायत व जैन शेंकडा १०, मराठे शेंकडा ८, मुसलमान शेंकडा ७॥ व कुणबी शेंकडा १॥ शिकणारे होते.

# श्रीशाहू महाराजांची कारकीर्द.

४९. श्रीशाहू महाराज १८८४ सालीं मार्च महिन्यांत गादीवर बसले. पण ते अल्पवयी असल्यामुळें १८९४

पर्यंत राज्यकारभार कौन्सिलमार्फत चालत होता. या कौन्सिलचे अध्यक्ष महाराजांचे मूळ घराण्यांतील वडील श्री० जयसिंगराव आबासाहेब कागलकर हे १८८५ च्या मार्चपर्यंत होते. पुढें पोलिटिकल एजंट हे अध्यक्ष असत. या १२ वर्षांच्या कारकीर्दींत राज्यांत अनेक सुधारणा झाल्या. कोल्हापुरापासून मिरजेपर्यंत २३ लक्ष रु० खर्चून आगगाडी सुरू केली. नवीन राजवाडा, कळंबे तलाव, दवाखाना वगैरे कामें पूर्ण झालीं. शाळांची संख्या २१५ झाली. १८८२ सालीं मुलींच्या शाळा ५ होत्या त्या १८९४ सालीं २४ झाल्या. त्यांत १२५० मुली शिकूं लागल्या. श्री० आबासाहेब कागलकर परलोकवासी झाल्यावर त्यांच्या स्मरणार्थ " **जयसिंगराव उद्योगशाळा** " काढण्यांत आली. अस्पृश्य मुलांसाठीं १८९३ सालीं ४ शाळा सुरू होत्या व त्यांत १५० मुलें शिकत होतीं. स्त्रियांसाठीं नर्सीस [ उपचारिका ] तयार करण्याचा वर्ग सुरू करण्यांत आला.

## सांपत्तिक स्थिति.

५०. १८९३ सालीं या इलाख्यांत १४॥ लक्ष एकर जमीन लागवडीची होती. पैकीं १३ लक्ष एकर रयतेच्या

उपयोगांत होती. त्यांत १९ हजार एकर कापूस, १० हजार एकर तंबाखु, १५ हजार एकर ऊंस, ३ लक्ष एकर जोंधळा, १॥ लक्ष एकर भात, २५ हजार एकर हरभरा व ५२ हजार एकर भुईमूग पिकत होता.

## महाराजांचें शिक्षण.

५१. महाराजांना शिक्षणाकरितां राजकोट, धारवाड वगैरे ठिकाणीं मि० फ्रेजर वगैरे शिक्षकांच्या हाताखालीं ठेविलें होतें. विद्याभ्यास झाल्यावर सर्व हिंदुस्थानभर त्यांनीं प्रवास केला. आपल्या संस्थानांत सर्वत्र फिरून प्रजेची स्थिति त्यांनीं पाहिली. त्यांचा विवाह १८९१ सालीं मोठ्या थाटानें बडोद्याच्या खानविलकर घराण्यांतील कन्येबरोबर झाला. नंतर १८९४ च्या एप्रिलचे दुसरे तारखेस त्यांना पूर्ण मुखत्यारी देण्यांत आली.

## मुखत्यार कारकीर्द.

५२. या कारकीर्दीस आरंभ होऊन हल्लीं (१९१२ मध्यें) १८ वर्षें पूर्ण झालीं. ही आणखी अनेक वर्षें अशीच चालेल अशी सर्वांना आशा आहे. त्यांना श्रीराजाराम महाराज व श्रीशिवाजी महाराज असे दोन पुत्र व श्रीराधाबाई

आक्कासाहेब महाराज नांवाची कन्या आहे. आक्कासाहेबांचा देवासच्या थोरले पातीचे राजेसाहेबांशीं विवाह झाला असून, त्यांचे पोटीं श्रीविक्रमसिंह नामक राजपुत्र जन्मले आहेत.

## मागसलेल्या जाती.

५३. महाराजांचे आतांपर्यंतचे कारकीर्दींत शाळांची संख्या ३४१ पर्यंत वाढली आहे. विशेषतः मागसलेल्या जातींच्या शिक्षणास त्यांनीं फार उत्तेजन दिलें आहे. त्यांनीं मराठे, जैन, लिंगायत, मुसलमान, शिंपी, महारमांग वगैरे जातींच्या मुलांना इंग्रजी शिकण्यास मदत व्हावी ह्मणून बोर्डिंगें काढविलीं आहेत व त्यांस मदत केली आहे. मागसलेल्या वर्गांच्या शिकलेल्या लोकांस त्यांनीं नोकऱ्या देऊन, त्यांच्यांत शिक्षणप्रसार होण्यास मदत केली आहे.

## महाराजांचें क्षत्रियत्व.

५४. शककर्ते शिवाजी महाराज हे सूर्यवंशी क्षत्रिय असून, उदेपूरचा राणा अजयसिंह याचा पुत्र जो सज्जनसिंह त्याच्या वंशांत त्यांचा जन्म झाला. त्या घराण्यांतील " भोसाजी " नामक एका राजाच्या नांवावरून त्यांस

" भोसले " असें आडनांव मिळालें. असें असतां शिवाजी महाराजांच्या वेळीं व नंतर पुनः प्रतापसिंह महाराजांच्या वेळीं [ १८४० चे सुमारास ] ब्राह्मणांनीं वाद सुरू केला. भोसले वंश क्षत्रिय नाहीं, असें ते कुत्सितपणानें ह्मणूं लागले. परंतु उदेपूरच्या महाराजांनीं व पंडितानीं हें ह्मणणें खोटें आहे असें कळविलें. यामुळें वादाचा, दोन वेळां, निकाल लागला. नंतर कोल्हापूरचे राजे अल्पवयी असतांना येथील ब्राह्मणांनीं महाराजांच्या धर्मभोळेपणाचा फायदा घेऊन पुनः शूद्रांचे विधि राजवाड्यांत सुरू केले. ही गोष्ट शाहूछत्रपतींच्या लक्षांत येतांच त्यांनीं क्षत्रियांचीं कर्में [ वेदोक्त विधि ] सुरू करण्याची आज्ञा राजोपाध्ये यांस केली. उपाध्येबुवांनीं वेदोक्त कर्में करण्याचें नाकारिलें. ह्मणून त्यांचें उत्पन्न सरकारांनीं खालसा केलें. [ सन १९०२. ]

५५. संकेश्वरचे स्वामी श्रीशंकराचार्य यांनीं प्रथम थोडे दिवस ब्राह्मणांचाच पक्ष घेतला. गादीस शिष्य करावयाचा तो सरकारमंजुरीनेंच केला पाहिजे, असा हुकूम असतां तो स्वामींनीं अमान्य केला. ह्मणून त्यांस दिलेलें उत्पन्न सरकारांनीं जप्त केलें होतें. पण दोनही बाबतींत त्यांचे

शिष्यस्वामींनीं पडतें घेऊन सरकारचें ह्मणणें कबूल केल्यामुळें उत्पन्न परत सोडण्यांत आलें.

## समतेची वागणूक.

५६. सन १९०२ चे मे महिन्यांत बादशहा सप्तम एडवर्ड यांच्या राज्याभिषेकानिमित्त महाराज विलायतेस गेले. तेथें असतांनाच, राज्यांतील निम्या नोकऱ्या मागसलेल्या जातींसाठीं राखून ठेवण्याची महाराजांनीं आज्ञा केली. बर्वे कारभारी यांच्या कारकीर्दींत बहुतेक एकाच जातीचे लोक सरकारी नोकरींत भरून गेले होते. यामुळें इतर जातींची फार नुकसान होत होती. ह्मणूनच महाराजांनीं हा ठराव केला.

## इभ्रतीची वाढ.

५७. इ० सन १९०० सालीं छत्रपतींचे घराण्यास "महाराज" ही पदवी वंशपरंपरेनें इंग्रज सरकारांनीं दिली. १९०३ सालीं बावडा, विशाळगड, कागल व इचलकरंजी या जहागिरीसंबंधानें हायकोर्टाचे सर्व अधिकार महाराजांस असल्याबद्दल दरबारांत प्रसिद्ध करण्यांत आलें. पूर्वींच्या अव्यवस्थेच्या काळांत हे अधिकार पोलिटिकल एजंटांनीं

आपल्याकडे घेतले होते. ते परत देऊन, "कोल्हापूर राज्याची आपल्या पूर्वीच्या इभ्रतीचे ठिकाणीं पुनरपि स्थापना होण्याच्या दिशेनें हें एक महत्वाचें पाऊल" टाकण्यांत आलें असें यासंबंधानें मुंबई सरकारांनीं ह्मटलें आहे. यानंतर खुद्द महाराजांना २१ तोफांचा सन्मान सन १९०९ सालीं देण्यांत आला. हा सन्मान हिंदुस्थानांत फक्त आणखी तीन चारच राजांना आहे.

## राजद्रोहाचा प्रतिबंध.

५८. गेल्या दहा बारा वर्षांपासून सर्व देशभर राजद्रोह वाढूं लागलेला आहे. त्यांतून मागसलेल्या जातींना महाराजांनीं उत्तेजन दिल्यामुळें व क्षात्रियोचित पद्धतीनें राजवाड्यांत धर्मकृत्यें करविण्याचें सुरू केल्यामुळें या इलाख्यांतील ब्राह्मणांना आपली नुकसान झाली असें वाटूं लागलें. महाराज सरकार बादशहांशीं अत्यंत राजनिष्ठेनें वागतात, यामुळें वरील दोनही असंतोष एकवटून राजद्रोहास मोठा जोर आला. ह्मणून सभा व वर्तमानपत्रें यांचें नियमन करणारे दोन कायदे करण्यांत आले. (१९०७). कांहीं राजद्रोही कामदारांना नोकरींतून कमी करण्यांत आलें. राज-

द्रोही लेख लिहिणाऱ्यांना शिक्षा करण्यांत आल्या. बाँब तयार करणाऱ्यांचा कट उघडकीस आणून त्याबद्दल कित्येकांना शासन केलें.

## सांपत्तिक उन्नति.

५९. रेल्वेचा फायदा घेण्यासाठीं महाराज सरकारांनीं कोल्हापूरनजीकच एक नवीन पेठ वसविली व त्यास शाहूपुरी असें नांव दिलें. सन १८५० सालीं या संस्थानांत १ लक्ष २० हजारांचा गूळ पिकत असे. १८९४ सालीं ८॥ लक्षांचा पिकूं लागला होता. हल्लीं फक्त शाहूपुरींतून बाहेर देशांत- दरसाल ४० लक्षांचा गूळ जाऊं लागला आहे. कालवा काढून ही संपत्ति आणखी वाढविण्याचा महाराज प्रयत्न करीत आहेत.

प्रजाहिताचीं मोठमोठीं कामें श्रीशाहू महाराजांचे हस्तें अशींच होत जावोत व त्यांचें राज्य चिरकाल चालो अशी प्रजेची परमेश्वरास प्रार्थना आहे.